**"डिसेंबर २०१७" या महिन्यात सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालयामधील सेवा उपविभागाने घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयांची संक्षिप्त माहिती...**

**(क) शासन निर्णय / अधिसूचना**

- दिनांक २ डिसेंबर २०१७ च्या शासन पूरक पत्रान्वये पद भूतपूर्व दुय्यम सेवा निवड मंडळाच्या कक्षेतील गट-ब (अराजपत्रित) व गट-क संवर्गाच्या पदभरतीच्या लेखी परीक्षेत जर उमेदवारांना समान गुण मिळाल्यास कोणत्या उमेदवारास प्राधान्य देण्यात यावे याबाबत विहित करण्यात आलेल्या प्राधान्यक्रमामध्ये आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या पाल्यांचा समावेश करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

- दिनांक ५ डिसेंबर २०१७ च्या शासन निर्णयान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये नवीन ५ संवर्गाचा समावेश करण्यात आला आहे.

- दिनांक ८ डिसेंबर २०१७ च्या परिपत्रकान्वये राज्यसेवा परीक्षा २०१६ च्या अंतिम निकालाच्या आधारे शिफारसप्राप्त ठरलेल्या गट-अ व गट-ब मधील उमेदवारांच्या प्रशिक्षणासाठीचा एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-४, २०१७ च्या मार्गदर्शक सूचनांमध्ये सुधारणा करण्यात आली आहे.

- दिनांक १२ डिसेंबर २०१७ च्या शासन निर्णयान्वये सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाच्या अनिवार्य खर्चासाठी यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे या संस्थेला जून २०१७ ते डिसेंबर २०१७ या सात महिन्यांकरिता योजनेतर खर्चासाठी (प्रशिक्षण शुल्क) अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर उपलब्ध असलेले एकूण रु.१७५.०० लाख इतके सहायक अनुदान (दुसरा हप्ता) मंजूर करण्यात आले आहे.

- दिनांक १२ डिसेंबर २०१७ च्या शासन निर्णयान्वये सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाच्या अनिवार्य (वेतनेतर) खर्चासाठी मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, नाथनगर (उत्तर) पैठण, औरंगाबाद या संस्थेला कार्यालयीन खर्चासाठी जून २०१७ ते डिसेंबर २०१७ या सात महिन्यांकरिता अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर उपलब्ध असलेले रु.८.६७ लाख इतके योजनेतर सहायक अनुदान (दुसरा हप्ता) मंजूर करण्यात आले आहे.

- दिनांक १२ डिसेंबर २०१७ च्या शासन निर्णयान्वये सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाच्या अनिवार्य (वेतनेतर) खर्चासाठी डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती या संस्थेला कार्यालयीन खर्चासाठी जून २०१७ ते डिसेंबर २०१७ या सात महिन्यांकरिता अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर उपलब्ध असलेले रु.८.६७ लाख इतके योजनेतर सहायक अनुदान (दुसरा हप्ता) मंजूर करण्यात आले आहे.

- दिनांक १५ डिसेंबर २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये सन २०१६-१७ या प्रतिवेदन वर्षासाठी गट-अ संवर्गातील निवडक अंधिकाऱ्यांचे कार्यमुल्यमापन अहवाल ऑनलाईने पद्धतीने नोंदविण्यासाठी दिनांक ३१ जानेवारी २०१८ पर्यंत वाढविण्यात आली आहे.

- दिनांक १५ डिसेंबर २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये सन २०१७-१८ पासून गट-अ आणि गट-ब (राजपत्रित) संवर्गातील अधिकाऱ्याचे कार्यमुल्यमापन अहवाल महापार प्रणालीत ऑनलाईने पद्धतीने लिहिण्याकरिता समन्वय अधिकाऱ्यांची नियुक्ती व EMD (Employee Master Data) तयार करण्याबाबत सूचना निर्गमित केल्या आहेत.

- दिनांक १९ डिसेंबर २०१७ च्या शासन निर्णयान्वये अखिल भारतीय सेवा (कार्य मुल्यांकन अहवाल) नियम २००७ प्रमाणे सन २०१७-१८ मध्ये भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांनी महसूल विभागनिहाय निश्चित केलेल्या खाजगी रुग्णालयातून करुन घ्यावयाच्या वैद्यकिय तपासणीबाबत सूचना निर्गमित केल्या आहेत.

- दिनांक २० डिसेंबर २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांनी त्यांची सन २०१७ या वर्षाची दिनांक १ जानेवारी २०१८ रोजीची स्थिती दर्शविणारी वार्षिक अचल मालमत्ता विवरणपत्रे (IPR) online पद्धतीने सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

- दिनांक २२ डिसेंबर २०१७ च्या शासन निर्णयान्वये, एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-४, कक्ष अधिकारी गट-ब संवर्गातील परिविक्षाधीन उमेदवारांच्या परिविक्षा कालावधीतील वेतनासंदर्भात दिनांक २६ सप्टेंबर २०१७ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आलेल्या निर्देशातील परिच्छेद-४ मधील मुद्दा ब व ड मधील मार्गदर्शक सूचनांमध्ये सुधारणा करण्यात आली आहे.

- दिनांक २७ डिसेंबर २०१७ च्या शासन निर्णयान्वये, यशदा , पुणे, ६ विभागीय व ३६ जिल्हास्तरीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्थांकरिता सन २०१७-१८ करिता ८०,०४० प्रशिक्षणार्थिंचा अंतिम केलेल्या प्रशिक्षणाचा आराखड्याच्या रू.२६६१.७६ लाख इतक्या प्रशासकीय प्रशिक्षणाच्या खर्चापैकी, सदर अनुदानाच्या मर्यादेत अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर उपलब्ध झालेल्या रू.१८९०.०० लाख इतक्या प्रशासकीय प्रशिक्षणाच्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली आहे. दिनांक १ एप्रिल २०१७ ते ३१ ऑक्टोबर २०१७ या कालावधीत संस्थांमध्ये झालेले प्रशिक्षण आणि १ नोव्हेंबर २०१७ ते ३१ जानेवारी २०१८ या कालावधीत होणारे प्रशिक्षण विचारात घेऊन प्रशिक्षण शुल्कानुसार प्रशिक्षण खर्चासाठी रू.११५०.०० लाख इतके अनिवार्य ३१ सहायक अनुदान (वेतनेत्तर) मंजूर करण्यात आले आहे.
- दिनांक २९ डिसेंबर २०१७ च्या शासन निर्णयान्वये यशदा, पुणे यांना वेतन व वेतनेत्तर या उद्दिष्टाखाली ३,०६,८४,०००/- इतके अनुदान वितरीत करण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे.
- दिनांक २९ डिसेंबर २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९८१ मधील नियम २३ च्या तरतुदीनुसार कार्यवाही करण्याच्या सूचनांचा पुनरूच्चार करण्यात आला आहे.

### (ख) बदली / मुदतपूर्व बदली / बदलीस स्थगिती / बदली रद्द / पदस्थापनेत बदल

- १ कक्ष अधिकाऱ्याची बदली स्थगित व १ कक्ष अधिकाऱ्याची बदली रद्द करण्यात आली आहे.
- कक्ष अधिकारी, सहायक कक्ष अधिकारी संवर्गातील अनुक्रमे १, १ अशा २ अधिकारी / कर्मचाऱ्यांना कार्यमुक्त करण्यात आले आहे.

### (ग) पदोन्नती / पदावनती / पदोन्नतीचा मानीव दिनांक व नियमित दिनांक

- "सहायक कक्ष अधिकारी" मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा-२०१७ मधील ५० शिफारसप्राप्त उमेदवारांपैकी खुल्या प्रवर्गातून शिफारस केलेल्या ३२ उमेदवारांचे मंत्रालयीन विभागात नियत वाटप करण्यात आले आहे.

- दिनांक ३० डिसेंबर २०१७ च्या ओशान्वये मंत्रालयीन विभागातील गट ड संवर्गातील १३ कर्मचाऱ्यांना लिपिक-टंकलेखक पदावर तात्पुर्ती पदोन्नती देण्यात आली आहे.

***********